# मेट्रो ३ ची ट्रेन वर्षअखेरीस मुंबईत



**मुंबई :** कुलाबा वांद्रे सिप्झ या मेट्रो -३ मार्गासाठी पहिली आठ डब्याची ट्रेन यावर्षाअखेर मुंबईत दाखल होणार आहे. ट्रेनचे आठ डबे स्वतंत्रपणे मुंबईत आणले जातील व त्यानंतर जोडले जातील. या प्रक्रियेला किमान दोन आठवड्याचा कालावधी लागेल.डब्यांची जोडणी झाल्यानंतर  पहिल्या ट्रेनच्या चाचणीस सुरुवात होईल. तात्पुरत्या स्वरूपात ट्रेनची चाचणी  व ट्रेन पार्क करण्यासाठी सुविधा निर्माण करण्याकरिता राज्य सरकारने परवानगी दिली आहे. या परवानगीच्या अनुषंगाने  मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक  रणजीत सिंह देओल यांनी मेट्रो ३ च्या पुढील वाटचालीविषयी माहिती दिली. ट्रेनच्या  चाचण्या रॅम्पच्या मुखाशी होणार आहेत. मरोळ-मरोशी मार्गाच्या पश्चिमेस जी जागा  अंडरपासमध्ये वळविल्यानंतर रिकामी झाली आहे तेथे रॅम्प उभारण्यात आला आहे. सध्या नमुना ट्रेनच्या चाचण्या होणार आहेत. ही ट्रेन मरोळ-मरोशी मार्गावर बांधण्यात येणाऱ्या तात्पुरत्या सुविधा जागेवरच पार्क करण्यात येईल.